दैनिक हेराल्ड
गोवा
रविवार, २७ एप्रिल २०२५


# दक्षिण गोव्यात स्थलांतरित कामगारांमुळे गुन्हेगारीत वाढ

## १ जानेवारी ते १६ एप्रिलपर्यंत पाच खून | दक्षिण गोवा पोलिसांकडून खून प्रकरणांची यशस्वी उकल

टीम दैनिक हेराल्ड



मडगाव, दि. २६ : दक्षिण गोव्यातील विविध गावांमध्ये स्थलांतरित कामगारांची संख्या गेल्या दशकात मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मुख्यतः बांधकाम व इतर क्षेत्रांमध्ये रोजगारासाठी येणाऱ्या या कामगारांच्या वाढीबरोबरच गुन्हेगारीच्या घटनांमध्येही वाढ झाली आहे. मात्र, यावर्षी आतापर्यंत नोंदवलेल्या सर्व खून प्रकरणांची दक्षिण गोवा पोलिसांनी यशस्वी उकल केली आहे.

१ जानेवारी ते १६ एप्रिल या कालावधीत दक्षिण गोव्यातील वेगवेगळ्या पाच खून प्रकरणांमध्ये पाच जणांना अटक करण्यात आली आहे. त्यापैकी तीन खून मार्च महिन्यात, तर एक एप्रिलमध्ये घडला. फेब्रुवारी महिन्यात, रायमध्ये पोलिसांनी ३५ वर्षांपासून फरार असलेल्या बसप्पा या आरोपीला अटक केली. बसप्पा हा कर्नाटकातील यादगीर येथील असून, त्याच्यावर १९९० साली भारतीय दंड विधान (आयपीसी) कलम ३०२ अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल होता.

मार्च महिन्यात वेर्णा पोलिसांनी कुठ्ठाळी पोल्ट्री फार्ममध्ये मोफत कोंबडी देण्याच्या वादातून घडलेल्या खून प्रकरणाचा तपास करत संतोष इंदर मल्लिक (२२) आणि प्रधान नलिका मंडल (३५) यांना अटक केली. यामध्ये अनिल मुथामाझी (२०) याचा मृत्यू झाला होता तर जिहुसया मंडल (३९) हा गंभीर जखमी झाला होता.

त्याच महिन्यात मुरगाव पोलिसांनी एका व्यक्तीला त्याच्या मोठ्या भावावर चाकूने हल्ला केल्याप्रकरणी अटक केली. दुसऱ्या एका धक्कादायक घटनेत, उसगाव येथे एका जोडप्याने त्यांच्या शेजारी राहणाऱ्या पाच वर्षांच्या मुलीची हत्या करून तिचा मृतदेह अंगणात पुरल्याप्रकरणी अटक झाली.

एप्रिलमध्ये मायना – कुडतरी पोलिसांनी ३८ वर्षीय खगेश्वर साबर यांच्या हत्येप्रकरणी ओडिशा राज्यातील दोन व्यक्ती – शशिबंत माझी (४३) आणि रबी माझी (२८) याना अटक केली. खगेश्वर साबर यांचा मृतदेह रायमधील त्यांच्या भाड्याच्या खोलीत आढळून आला होता. दारूच्या नशेत झालेल्या वादातून हा प्रकार घडल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या सर्व प्रकरणांमध्ये आरोपी स्थलांतरित कामगार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

गावांमध्ये जलद शहरीकरण आणि औद्योगिक विकास यामुळे गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची चिंता स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. मडगाव, कुडतरी, कोलवा, फातोर्डा आणि कुंकळ्ळी या भागांतील नागरिकांनी पोलिसांकडून सुरक्षा उपाययोजनांमध्ये वाढ करण्याची मागणी केली आहे.

मडगावचे वरिष्ठ वकील विनय पाटकर यांनी सांगितले की, कर्नाटक, ओडिशा, आसाम, उत्तरप्रदेश, झारखंड आणि पश्चिम बंगालसारख्या राज्यांतून येणाऱ्या स्थलांतरित कामगारांची संख्या वाढत आहे. या कामगारांपैकी बहुतांश तरुण अविवाहित असून, अनेकदा त्यांच्या पार्श्वभूमीची योग्य पडताळणी न करता त्यांना रोजगार दिला जातो, असे त्यांनी सांगितले. परिणामी, खून व हल्ल्यांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे ते म्हणाले.

दक्षिण गोवा पोलिसांनी गुन्हेगारीवर आळा बसवण्यासाठी विविध उपाययोजना राबविल्या आहेत. पोलिस विभागाने भाडेकरू आणि नोकर पडताळणी मोहीम गतीमान केली असून, १२ मार्चपर्यंत ६७० फॉर्म प्रक्रियेत असून, पडताळणीसाठी मुख्यालयाकडे पाठविण्यात आले आहेत.

कोलवा पोलिस ठाण्याचे निरीक्षक रितेश तारी यांनी सांगितले की, त्यांनी किनारपट्टी भागात भाडेकरूंची पडताळणी अधिक कठोरपणे सुरू केली आहे. संपूर्ण अनुपालन सुनिश्चित करण्यासाठी तेथील गावांमध्ये नियमित तपासणी केली जात आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## निवडक

### गावडेवंश देवस्थानचा ३० रोजी वर्धापनदिन

टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २६** : मधलावाडा येथील श्री गावडेश्वर देवस्थानचा २० वा वर्धापनदिन सोहळा अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर, बुधवार, दि. ३० एप्रिल रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे. सकाळी ९ वाजता धार्मिक विधी, अभिषेक, स्थल शुद्धी, दुपारी आरती, तीर्थप्रसाद, दुपारी १ वाजता पावणी व महाप्रसाद होईल. संध्याकाळी सुहासिनीचा दिवजोत्सव व रात्री ९ वा विजय तुळसकर दिग्दर्शित तीन अंकी 'कथा कुणाची व्यथा कुणा' नाटक सादर होईल. या नाटकात अरुण गावडे, दीपक गावडे, प्रकाश गावडे, महादेव गावडे, संकेत गावडे, अमन गावडे, विघ्नेश गावडे, अजित मोरजकर, दीपाली गावडे व नमिता पिंगे यांच्या भूमिका आहेत.

---

### कुलदेवता सातेरी पंचायतनचा मंगळवारी वर्धापनदिन सोहळा

टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २६** : मराठवाडा–मांद्रे येथील श्री कुलदेवता सातेरी पंचायतन देवस्थानचा २४ वा वर्धापनदिन सोहळा दि. २९ व ३० एप्रिल रोजी होणार आहे. दि. २९ रोजी सकाळी ९ वा. श्री पाटेश्वर चरणी प्रार्थना व दुपारी ३ वा. सत्यनारायण महापूजा आणि सायंकाळी ६ वा. मराठवाड्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा. त्यानंतर सायंकाळी ७ वा. कलाचेतना वळवई प्रस्तुत 'डायरेक्ट चंद्रार' हे दोन अंकी विनोदी कोकणी नाटक सादर होणार आहे. दि. ३० रोजी सकाळी ९ वा. विविध धार्मिक विधी, त्यानंतर श्री देवी सातेरी व परिवार देवतांची अभिषेकपूर्वक महापूजा, होमवहन, बलिदान, पूर्णाहुती व आरती. सकाळी ११ वा. पावणी आणि दुपारी १२ वा. देवतांचा कौल व महाप्रसाद होणार आहे. सायंकाळी ६ वा. सुहासिनीचा जोडियोत्सव कार्यक्रम व रात्री ७.३० वा. श्री सातेरी नाट्य मंडळ मराठवाडा प्रस्तुत 'सं. शारदा' हे नाटक होणार आहे.

---

### पार्सेत २९ रोजी 'पराधीन आहे जगती'

टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २६** : श्री देवी सातेरीच्या वाढदिवसानिमित्त श्री सिद्धीविनायक कलासंगम युवा व महिला संघ – पार्से मंगळवार, दि. २९ संध्याकाळी ७.३० वा 'पराधीन आहे जगती' या नाटकाचा शुभारंभ करणार आहे. या नाटकाचा प्रयोग श्री देवी भगवती रंगमंच पार्से येथे होईल. पहिल्या नाट्यप्रयोगाच्या उद्घाटनाला प्रमुख पाहुणे म्हणून मांद्रेचे माजी सरपंच विद्यमान, पंचसदस्य प्रशांत ऊर्फ बाळा नाईक, निमंत्रित पाहुणे म्हणून पार्सेचे सरपंच अजय कळंगुटकर, देवस्थान समितीचे सदस्य जगदीश लाड, पत्रकार महादेव गवंडी , नाटकाचे लेखक मोहन बुगडे, दिग्दर्शक किशोर बुगडे, प्रकाशक नीलेश बुगडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे. या नाटकात कु. प्रगती ल. च्यारी , सौ. किरण कि. बुगडे , मेघनी म. बुगडे, कनिक्षा स. म्हालदार, अन्वी दा. निळोजी, राजेश्री वेंगर्लेकर, केशव भिसाजी , संदीप पोळजी, नरेंद्र सावंत, तुकाराम भिसाजी, आत्माराम चंद्रोजी, दामोदर निळोजी, यश रायकर , प्रणय च्यारी यांच्या भूमिका आहेत.

---

### कळंगूट अपघातात ब्रिटिश पर्यटकाचा मृत्यू

टीम दैनिक हेराल्ड

**कळंगूट, दि. २६** : गाझियाबाद येथील एका पर्यटकाने बेदरकारपणे गाडी चालवत इंग्लंडमधील ८० वर्षीय एनआरआय पर्यटकाला धडक दिल्याने त्यात त्यांचा मृत्यू झाला असून या पर्यटकाची जखमी पत्नी गंभीर अवस्थेत आहे. ही घटना शुक्रवारी कांदोळी येथे घडली. जखमी पत्नीवर बांबोळी येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

कळंगुट पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृतक हरीश सोलंकी (८६) आणि त्यांची पत्नी चंद्रकांता सोलंकी (८१) कांदोळी प्राथमिक आरोग्य केंद्राजवळील एका रिसॉर्टसमोर रस्त्याकडेला चालत होते. त्यावेळी, विकी जैन (४८) याने मारुती सुझुकी बलेनो कारने वेगाने येत त्यांना धडक दिली. घटनेनंतर तात्काळ दोघांना रुग्णवाहिकेतून बांबोळी येथील गोवा मेडिकल कॉलेजमध्ये नेण्यात आले, जिथे हरीश सोलंकी यांचे निधन झाले. गंभीर जखमी झालेल्या चंद्रकांता सोलंकी यांची स्थिती गंभीर आहे आणि तिच्यावर उपचार सुरू आहेत. दोघेही ब्रिटिश पासपोर्टधारक होते, असे पोलिसांनी सांगितले. अपघाताच्या वेळी गाडी चालवत असलेल्या विकी जैन, जो उत्तर प्रदेशातील गाझियाबाद येथील रहिवासी आहे, याला पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी जैनविरुद्ध बीएनएस कायदा, २०२३ च्या कलम २८१, १२५ (अ), १२५ (ब) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांच्या तपासानुसार, सिकेरीहून कळंगुटकडे जात असताना विकी जैनने योग्य काळजी आणि खबरदारी न घेत गाडी वेगाने चालवली. कांदोळीजवळ फिशरमन कोव्ह रेस्टॉरंटच्या समोर कारवरील नियंत्रण गमावल्याने त्याने या पादचाऱ्यांना धडक दिली. पुढील तपास सुरू आहे. पोलिसांनी ब्रिटिश उच्चायुक्तालयाला घटनेची माहिती दिली आहे, कारण अपघातात सहभागी असलेले जोडपे ब्रिटिश नागरिक होते.

# पाकिस्तानच्या निर्णयानंतर डीजीसीएकडून विमान कंपन्यांना सल्ला

नवी दिल्ली, दि. २६ :




पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यानंतर पाकिस्तानने भारतीय विमान कंपन्यांसाठी आपले हवाई क्षेत्र बंद केल्याने भारताच्या आंतरराष्ट्रीय उड्डाण सेवांवर परिणाम होऊ लागला आहे. या पार्श्वभूमीवर नागरी उड्डयन महासंचालनालयाने (डीजीसीए) विमान कंपन्यांसाठी एक महत्त्वाचा सल्ला जारी केला आहे.

शनिवारी जारी करण्यात आलेल्या या सल्ला पत्रकात , डीजीसीएने स्पष्टपणे नमूद केले आहे की पाकिस्तानचे हवाई क्षेत्र बंद झाल्यामुळे विशेषतः दिल्ली आणि इतर उत्तर भारतीय शहरांशी संबंधित आंतरराष्ट्रीय उड्डाणांच्या वेळेत वाढ झाली आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सोयीसाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.डीजीसीएने सर्व विमान कंपन्यांना प्रवाशांना उड्डाणाची अचूक व अद्ययावत माहिती देण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, प्रवासादरम्यान अन्न व पेय सुविधा उपलब्ध करून देण्याचे बंधनकारक केले आहे. या पत्रकात म्हटले आहे की, विमान कंपन्यांनी प्रवाशांना मार्गातील बदल, वाढलेली प्रवास वेळ आणि प्रवासातील अन्य संभाव्य थांबे याबाबत पूर्ण माहिती द्यावी. तसेच, प्रवाशांच्या गरजेनुसार अन्न, नाश्ता व जेवण पुरवण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात यावी.दीर्घ उड्डाणांसाठी वैद्यकीय किट्सचा आवश्यक साठा ठेवण्याचे आणि विमानतळांवर तातडीच्या आरोग्य सुविधांची खात्री करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. विमान विलंबाच्या परिस्थितीत प्रवाशांना तत्काळ माहिती देण्यासाठी आणि तक्रारींचे निराकरण करण्यासाठी, कॉल सेंटर तसेच ग्राहक सेवा पथके सज्ज ठेवण्याची सूचना करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, आवश्यक वेळेपेक्षा जास्त विलंब झाल्यास, विमान कंपन्यांनी प्रवाशांना योग्य भरपाई देण्यास तयार राहावे, असा सल्ला पत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

# जलसंपदा विभागावर खारफुटी नष्ट केल्याचा आरोप

- तळपण नदीच्या काठावर संरक्षण भिंत उभारण्यासाठी झाडांची कत्तल

टीम दैनिक हेराल्ड



**काणकोण, दि. २६** : तळपण नदीच्या काठावर संरक्षक भिंत उभारण्यासाठी सुरू असलेल्या कामात खारफुटीच्या झाडांचे नुकसान झाल्याचा आरोप जलसंपदा विभागावर करण्यात आला आहे. हे काम पैंगिणी येथील अर्धाफोंड भागात सुरू असून, स्थानिक पर्यावरणीय समतोल धोक्यात येण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

गोवा फॉरवर्ड पार्टीच्या पर्यावरण विभागाचे अध्यक्ष विकास भगत यांनी कामाच्या ठिकाणी जेसीबी मशीनच्या साहाय्याने सुरू असलेल्या कामाची पाहणी केल्यानंतर तातडीने काणकोण उपजिल्हाधिकारी, मामलेदार तसेच पोलिस निरीक्षकांना घटनास्थळी तपासणी करण्याची विनंती केली.

भगत यांनी सांगितले की, अर्धाफोंड येथील चॅपलच्या मागील परिसरातील हे काम स्थानिक परिसंस्थेस गंभीर धोका निर्माण करत आहे. विकासाच्या नावाखाली जर खारफुटीची नष्टिकरण सुरू असेल, तर आम्ही त्याचा तीव्र निषेध करतो. हा प्रकार विकसित गोवा किंवा विकसित भारत योजनेंतर्गत असो वा नसो, सरकारमान्य अशी पर्यावरणाची हानी कोणत्याही परिस्थितीत स्वीकारली जाणार नाही, असे भगत यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की, या संरक्षित खारफुटींची कत्तल करण्यास कोणती अधिकृत परवानगी घेण्यात आली? एकूण परिसंस्थेच्या रक्षणासाठी खारफुटी अत्यावश्यक आहेत. त्या किनारपट्टी स्थिर करण्यात जैवविविधतेच्या संवर्धनात आणि कार्बन शोषणात महत्त्वाची भूमिका बजावतात. यासोबतच, भगत यांनी काणकोण मतदारसंघाचे आमदार आणि राज्य विधानसभेचे अध्यक्ष रमेश तवडकर यांचे लक्ष वेधले असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच, पुढील कोणताही विकास प्रकल्प सुरू करण्यापूर्वी पर्यावरणीय नाशाच्या परिणामांची योग्य ती जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# लईराई देवीची जत्रा २ मे पासून

टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २६** : लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या व गोवा तसेच इतर राज्यातही प्रसिद्ध असलेल्या शिरगाव येथील श्री देवी लईराईचा प्रसिद्ध जत्रोत्सव २ मे रोजी सुरु होत असून त्यासाठी सोमवारपासून धोंड व्रत करणार आहेत.या जत्रेसाठी ग्रामीण भागातील शेकडो धोंड व्रतासाठी सज्ज झाले आहेत.

देवीचे धोंड व्रत स्वीकारून उपवास व सोवळे पालन करून मंगलमय वातावरणात देवीची भक्ती करतात. पाच दिवस अलिप्त राहून सोवळे पालन करताना मंदिर, नदी काठी, तलाव किंवा नैसर्गिक झरे, धोंडासाठी उभारण्यात येणारे मंडप या ठिकाणी पाच दिवस व्रत केले जाते.

सामान्य नागरिक, लहान मुले तसेच ज्येष्ठ महिला ही सोवळे पालन करून अग्निदिव्यासाठी सज्ज होत असतात. देवस्थान समितीचे नूतन अध्यक्ष दीनानाथ गावकर यांनी जत्रोत्सवानिमित्त लाखो भाविक जत्रोत्सवात पाच दिवस हजेरी लावत असल्याने तयारी जोरात करण्यात येत आहे. मामलेदार व अन्य यंत्रणेमार्फत संयुक्त बैठक घेऊन व्यवस्थापन नेटके करण्यासाठी प्रक्रिया सुरू आहे, असे सांगितले.

जत्रोत्सवानिमित्त गोवा व इतर भागातून हजारो भाविक या शिरगाव गावात दाखल होणारे असल्याने संपूर्ण गावात उत्साहाचे आनंदाचे वातावरण असते . त्यासाठी नवीन खरेदी रंगरंगोटी सजावट आधी कामे घरोघरी सुरू झाली आहेत.

जत्रोत्सवात संपूर्ण गोव्यात बाजारात तसेच बाजूच्या भागात लाखो रुपयांची उलाढाल होत असते. नवीन खरेदी तसेच कपडे, खाद्यपदार्थ, अन्नपदार्थ फळे, फुले याला मोठी मागणी असते. मोगरीच्या कळ्यांना मोठ्या प्रमाणात मागणी असल्याने गोवा तसेच इतर राज्यातूनही शेकडो लोक मोगरी कळे विकण्यासाठी शिरगावात दाखल होत असतात. बाजारपेठेत यानिमित्त लाखो रुपयांची उलाढाल होत असते. दरवर्षी नवीन धोंड नोंदणी होत असल्याने गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या परंपरेत धोंडांची संख्या वाढत असते.

पाच दिवस व्रत सुरू होणार असल्याने अनेक ठिकाणी माडाच्या चुडताचा वापर करून सुंदर मंडप उभारला जातो. मये तिखाज न येथील धोंड अजय कोरगावकर, समीर ठाणेकर, श्याम कवठणकर, प्रमोद चोड ण कर यांनी आम्ही व्रतासाठी सज्ज होत असल्याचे सांगितले. धोंड जिथे वास्तव्य करतात ती जागा परिसर शेणाने सारवला जातो. शितोडा घातला जातो. व्रतस्थ धोंड नदी, झर विहीर मंदिर परिसरात गटा गटाने राहतात व व्रत करतात. काही पाच, काही तीन दिवस व्रत करतात. त्यामुळे सर्वच ठिकाणी चांगले वातावरण असते.

# फोंडा येथे महामार्गाच्या कामाची गती मंदावली

टीम दैनिक हेराल्ड



स्थानिकांत तीव्र असंतोष : लवकरात लवकर अंडरपासचे बांधकाम पूर्ण करण्याची मागणी

**फोंडा, दि. २६** : फोंडा परिसरातील महामार्गाच्या कामांची गती मंदावल्याने स्थानिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. विशेषतः बांदोडा व सफा मशीद या दोन प्रमुख जंक्शनवर अपघातांच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने, लवकरात लवकर सेवा रस्ते आणि अंडरपासचे बांधकाम पूर्ण करण्याची जोरदार मागणी होत आहे.

सध्या बांदोडा व सफा मशीद जंक्शन येथे राष्ट्रीय महामार्गाच्या चारपदरी विस्तारीकरणाचे काम सुरू असून, या जंक्शनसाठी स्वतंत्र सेवा रस्ते आणि अंडरपास उभारले जात आहेत. बहुतेक अप्रोच रस्त्यांचे आणि अंडरपासचे काम पूर्ण झाले असले तरी, सेवा रस्त्यांचे काम अद्याप अपूर्ण आहे. तसेच, गॅस लाईनच्या स्थलांतराच्या कामात झालेल्या विलंबामुळे अंडरपास वाहतुकीसाठी खुला करण्यात अडथळा निर्माण झाला आहे, अशी माहिती राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी दिली. अधिकाऱ्यांनी सांगितले की, वाहतूक सुरळीत करण्यासाठी सर्व कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

स्थानिक सामाजिक कार्यकर्ते नरेश नाईक यांनी सांगितले की, गेल्या काही महिन्यांपासून या भागात अपघातांचे प्रमाण वाढले आहे. नुकत्याच घडलेल्या एका घटनेत, फोंड्यातील एका युवकाचा ट्रक व दुचाकीच्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला.

सेवा रस्ते व अंतर्गत रस्त्यांवरील वाहने अचानक महामार्गावर येत असल्याने अपघातांची शक्यता वाढली आहे. त्यामुळे अपघात टाळण्यासाठी सेवा रस्ते आणि अंडरपासवरील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करणे आवश्यक आहे, असे नाईक यांनी सांगितले.

दरम्यान, पावसाळा तोंडावर आलेला असताना, बांदोडा व सफा मशीद जंक्शन परिसरात अपघाताचा धोका वाढू नये म्हणून, स्थानिक नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे काम जलदगतीने पूर्ण करण्याची मागणी केली आहे. महामार्गावरील सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक ती सर्व कामे पावसाळ्यापूर्वीच पूर्ण करावीत, अशी जोरदार मागणी सध्या करण्यात येत आहे.

# खोतिगाव चेकपोस्टबाबत वन विभागाकडून लेखी आश्वासनाचा निर्णय

- सरपंच वृंदा वेळीप यांची माहिती : वन विभागाबाबत सहकार्य न मिळाल्याच्या आरोपांचे खंडन

टीम दैनिक हेराल्ड

**काणकोण, दि. २६** : खोतिगाव – पिपळामळ भागात कोणतीही वन चौकी उभारली जाणार नाही, याबाबत वन विभागाकडून लेखी आश्वासन घेण्याचा निर्णय घेतल्याची माहिती खोतिगावच्या सरपंच वृंदा वेळीप यांनी दिली. खोतिगाव, पैंगिणी आणि श्रीस्थळ या तीनही पंचायतींच्या वतीने आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

सरपंच वेळीप यांनी खोतिगाव ग्रामस्थांच्या वतीने वन विभागाबाबत सहकार्य न मिळाल्याच्या आरोपांचे खंडन केले. वन विभागाच्या सहकार्यामुळेच राखीव वन व वन्यजीव अभयारण्य क्षेत्रात विविध विकासकामे मार्गी लागली आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेत पैंगिणीच्या सरपंच सविता तवडकर आणि श्रीस्थळच्या सरपंच सेजल गावकर यांचीही उपस्थिती होती. सविता तवडकर यांनी सांगितले की, आमोण, तिरवळ आणि मार्लिम या गावांमध्ये रस्ते आणि वीजपुरवठा करण्यासाठी वन विभागाने आम्हाला मोलाचे सहकार्य केले आहे.

खोतिगावचे उपसरपंच पूनम, माजी सरपंच आनंदू देसाई, सभापती रमेश तवडकर यांचे विशेष सहाय्यक संतोष लोलयेकर, काणकोण भाजप मंडळ अध्यक्ष प्रभाकर गावकर तसेच अनेक ग्रामस्थ या पत्रकार परिषदेस उपस्थित होते. लोलयेकर यांनी खोतिगाव वन्यजीव अभयारण्य क्षेत्रात पूर्ण झालेल्या आणि सध्या सुरू असलेल्या विकास प्रकल्पांची यादी सादर केली. त्यांनी नमूद केले की, या प्रकल्पांना वन विभागाचे सहकार्य लाभले आहे.

पिपळामळ येथे सुरू असलेल्या बांधकामाबाबत विचारले असता, सरपंच वेळीप यांनी स्पष्ट केले की, सदर बांधकाम वन कायद्यानुसार सुरू आहे. पंचायत संस्थेने कोणतीही परवानगी दिलेली नाही, तरीही आम्ही चेकपोस्ट उभारणीला तीव्र विरोध करणार आहोत. त्यांनी पुढे सांगितले की, आम्हाला सांगण्यात आले आहे की, हे बांधकाम केवळ वन कर्मचाऱ्यांसाठी विश्रांतीगृह म्हणून वापरण्यात येईल आणि ते चेकपोस्ट उभारणीसाठी वापरले जाणार नाही. वन विभागाने दिलेल्या मौखिक आश्वासनाला अधिकृत स्वरूप देण्यासाठी पंचायतीकडून लेखी आश्वासन मागितले जाणार असल्याचेही वेळीप यांनी जाहीर केले. माजी सरपंच आनंदू देसाई यांनी देखील जोर देत सांगितले की, जर वचनभंग करून पिपळामळ येथे चेकपोस्ट उभारण्याचा प्रयत्न केला, तर ग्रामस्थ आंदोलनाचा मार्ग पत्करतील.